294.5
VSa Har
50490

THE LIBRARY

S. N. D. T.
WOMEN'S UNIVERSITY
BOMBAY.

S. N. D. T. WOMEN'S UNIVERSITY
LIBRARY

24 APR 1979

अथ हरितालिका पूजा सार्थ कथा प्रारंभः

LIBRARY

24 APR 1972

50490


ब्राह्मण.
पार्वती.
शंकर.

श्रीगणेशायनमः ॥ ॥ अथहरितालिकापूजालिख्यते ॥ तत्रादौति
थिनिर्णयः ॥ भाद्रपदशुक्लतृतीयायांशिष्टपरिगृहीतंहरितालिकाव्र
तम् ॥ तच्चपरविद्धायांकार्यं ॥ मुहूर्तमात्रसत्वेपिदिनेगौरीव्रतंपरेइ
तिमाधवोक्तेः॥ हरितालिकाव्रतसत्वपुरस्कारेणापिपरविद्धाग्रहणव
चनाद्दिवोदासीयेउदाहृतत्वाच्च ॥ तत्रव्रतविधिः॥ भाद्रपदशुक्लतृ
तीयायांप्रातस्तिलामलककल्केनस्नात्वापट्टवस्त्रंपरिधाय ॥ मासप
क्षाद्युल्लिख्य ममआत्मनःपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं इहजन्मनिजन्मां
तरेच समस्तपापक्षयपूर्वकराज्याखंडितसौभाग्यादि विवृद्धये प्रति
वार्षिकंउमामहेश्वरप्रीत्यर्थंहरितालिकाव्रतमहंकरिष्ये ॥ तत्रादौ
गणपतिपूजनं कलशाराधनादिकरिष्ये गणपतिपूजनं कलशपूजनं

कृत्वा॥ अपवित्रःपवित्रोवा इतिमंत्रेणआत्मानंपूजाद्रव्याणिचप्रो
क्षयेत् गौरीयुक्तमहेश्वरंपूजयेत् ॥ अथपूजा ॥ पीतकौशेयवसनांहे
मामांकमलासनां भक्तानांवरदानित्यंपार्वतींचिंतयाम्यहं ॥ मंदार
मालाकुलितालकायैकपालमालांकितशेखराय दिव्यांबरायैचादिगंब
रायनमःशिवायैचनमःशिवाय ॥ श्रीउमामहेश्वराभ्यांनमः ध्याया
मि देवदेवसमागच्छप्रार्थयेहं जगन्मये इमांमयाकृतांपूजांगृहाणसु
रसत्तम श्रीउमामहेश्वराभ्यांनमःआवाहयामि भवानित्वंमहादेवि
सर्वसौभाग्यदायिके अनेकरत्नसंयुक्तमासनंप्रतिगृह्यतां आसनं०
॥ सुचारुशीतलंदिव्यंनानागंधसमन्वितं पाद्यंगृहाणदेवेशिमहादे
विनमोस्तुते पाद्यं० ॥ श्रीपार्वतिमहाभागेशंकरप्रियवादिनी ॥ अ

र्घ्यंगृहाणकल्याणिभर्त्रासहपतिव्रतेअर्घ्यं० ॥ गंगाजलंसमानीतंसु
वर्णकलशेस्थितम् ॥ आचम्यतांमहाभागेरुद्रेणसहितेनचे आच
मनं० ॥ गंगासरस्वतीतीरेपयोष्णीनर्मदाजलैः स्नापितासिमयादे
वितथाशांतिंप्रयच्छमे स्नानं० ॥ स्नानकालेपंचामृतेनस्नपयिष्ये
॥ सुरभीघृतसमुत्पन्नंदेवर्षिपितृवल्लभं ॥ पयोददामिदेवेशस्नानार्थं
प्रतिगृह्यतां पयस्नानं० ॥ चंद्रमंडलसंकाशंसर्वदेवप्रियंदधि ॥
स्नानार्थंतेप्रयच्छामिप्रीतोभवसुरेश्वर दधि० ॥ आज्यंसुराणामा
हारआज्यंयज्ञेप्रतिष्ठितंआज्यंपवित्रंपरमंस्नानार्थंप्रतिगृह्यतां घृत
॥ सर्वौषधिसमुत्पन्नंपीयूषसदृशंमधु. स्नानार्थंतेप्रयच्छामिप्रीतोभ
वसुरेश्वर मधु० ॥ इक्षुरसात्समुद्भतांशर्करांसुमनोहरां स्नानार्थंते

प्रयच्छामिप्रीतोभवसुरेश्वर शर्करा० गंधोदक० किरणा॥धूतपापाच पु०
पुण्यतोयासरस्वती मणिकर्णिकाजलंशुद्धंस्नानार्थंप्रतिगृह्यतां स्ना
नं० ॥ पूर्वपूजादिकंमहाभिषेकस्नानंकृत्वा ॥ सर्वभूषाधिकेसौम्ये
लोकलज्जानिवारणे ॥ मयोपपादितेतुभ्यंवाससीप्रतिगृह्यतां वस्त्रं ॥
नानामंत्रैःसमुद्भूतंत्रिसूतंब्रह्मसूत्रकंभवंतंसंप्रयच्छामित्वयाभक्त्या
तुगृह्यतांउपवीतं० ॥ कंचुकीमुपवस्त्रंचनानारत्नैःसमन्वितम् गृहा
णत्वंमयादत्तंचंडिकेचनमोस्तुते कंचुकीं०॥भूषणानिचस० कुंकुमाग
रुकर्पूरचंदनंकस्तुरीयुतंविलेपनंमहादेविगंधंदास्यामिभक्तितःगंधं०
॥ रंजिताःकुंकुमौघेनअक्षताश्चातिशोभनाः ॥ भक्त्यासमर्पितास्तु ॥२॥
भ्यंप्रसन्नाभवपार्वति अक्षतान्० ॥ हरिद्राकुंकुमंचैवसिंदूरंकज्जला

न्वितम् सौभाग्यद्रव्यसंयुक्तंगृहाणपरमेश्वरि ॥ सौभाग्यद्रव्याणि०
सेवंतिकाबकुलचंपकपाटलाब्जैः पुन्नागजातिकरवीररसालपुष्पैःबि
ल्वप्रवालतुळसीदलमालतीभिस्त्वांपूजयामिजगदीश्वरमेप्रसीद ॥
पुष्पं० अथांगपूजा ॥ उमायैनमः पादौपूजयामि ॥ गौर्यैनमःजंघे
पूजयामि ॥ पार्वत्यै० जानुनीपूजयामि० ॥ जगद्धात्र्यैन०ऊरूपू०
॥ जगत्प्रतिष्ठायै० ॥ कटिंपू० ॥ शांतिरूपिण्यै० ॥ नाभिंपू० ॥ देव्यै
न० उदरं० ॥ लोकवंदितायै० स्तनौपूजयामि॥ काल्यैनमः कंठंपू०॥
शिवायैनमः मुखंपूज० ॥ भवान्यैनमः नेत्रेपू०रुद्राण्यैनमः कर्णौपू०
शर्वाण्यैनमः ललाटंपू० मंगलदात्र्यैन० शिरःपूजयामि ॥ अथपत्रि
पूजा ॥गौर्यैनमः जातीपत्रंसमर्पयामि॥पार्वत्यैनमः सेवंतीपत्रं०चंडि

कायैनमःपारिजातकपत्रं०शिवप्रियायैनमःकण्हेरपत्रं० जगन्मात्रेन
मः बिल्वपत्रं०विद्याधारिण्यैनमःतुलसीपत्रं०क्षमायैनमःदूर्वापत्रं०
॥ अथपुष्पपूजा॥ शिवायनमः महेश्वरायनमः शंभवेनमः पिनाकि
नेनमः शशिशेखरायनमः वामदेवायनमः विरूपाक्षायनमः कपी
र्दिनेनमःनीललोहितायनमः शूलपाणिनेनमःखट्वांगिनेनमःविष्णु
वल्लभायनमः अंबिकानाथायनमः श्रीकंठायनमः ॥ देवद्रुमरसो
तद्भुतः कृष्णागरुसमन्वितः आनीतोयंमयाधूपोभवानिप्रतिगृह्य
तांधूपं० त्वंज्योतिःसर्वदेवानांतेजसांतेजउत्तमम् आत्मज्योतिःपरं
धामदीपोयंप्रतिगृह्यताम् दीपंस० अन्नंचतुर्विधंस्वादूरसैः षड्भिः
समन्वितम् नानापक्वान्नापूपैश्चददामिव्यंजनादिकं नैवेद्यंसम०

॥३॥

आचमनीयंस० मलयाचलसंभूतंकर्पूरेणसमन्वितम्करोद्वर्तनकंचा
रुगृह्यतांजगतःपते ॥ करोद्वर्तनंस० इदंफलंमयादेविस्थापितंपुरत
स्तव तेनमेसुफलावाप्तिर्भवेज्जन्मनि फलंस०पूगीफलंमहद्दिव्यंनाग
वल्यादलैर्युतं कर्पूरैलासमायुक्तंताम्बूलंप्रतिगृह्यताम् तांबूलं० हिर
ण्यगर्भगर्भस्थंहेमबीजंविभावसोः अनंतपुण्यफलदमतः शांतिंप्रय
च्छमे दक्षिणांसमर्पयामि वज्रमाणिक्यवैडूर्यमुक्ताविद्रुममंडितम्
पुष्परागसमायुक्तंभूषणंप्रतिगृह्यताम् भूषणंस० चंद्रादित्यौचधर
णीविद्युदग्निस्त्वमेवच त्वमेवसर्वज्योतींषिआर्तिक्यंप्रतिगृह्यताम्
नीराजनंस० अथनामपूजा उमायैनमः गौर्यैनमः पार्वत्यैनमः ज
गद्धात्र्यैनमः जगत्प्रतिष्ठायैनमः शांतिरूपिण्यैनमः हरायनमः म

हेश्वरायनमःशंभवेनमःशूलपाणयेनमःपिनाकधृषेनमःशिवायनमः
पशुपतयेनमः महादेवायनमः पुष्पाजलिंस० यानिकानिचपापानि
ब्रह्महत्यासमानिच तानितानिविनश्यंतिप्रदक्षिणपदेपदे प्रदक्षि
णां० अन्यथाशरणंनास्तित्वमेवशरणंमम तस्मात्कारुण्यभावेन
क्षमस्वपरमेश्वरिनमस्कारः ततोर्घ्यंदद्यात् ओंकारपूर्वकेदेविसर्वदुः
खनिवारिणि वेदमातर्नमस्तुभ्यंअवैधव्यंप्रयच्छमेअर्घ्यं० पतिव्रते
महाभागे वन्हिजातेशुचिस्मिते दृढव्रतेदृढमतेभर्तुश्चाप्रियवाादिनि
अर्घ्यं० अवैधव्यंचसौभाग्यंदेहित्वंममसुव्रते पुत्रन्पौत्रांश्चसौख्यंच
गृहाणार्घ्यनमोस्तुते अर्घ्यं० पुत्रन्देहिधनंदेहिसौभाग्यंदेहिसुव्रते
अन्यांश्चसर्वकामांश्चदेहिदेविनमोस्तुते ॥ इतिप्रार्थना ॥ ततोवैण

वपात्राणिसौभाग्यद्रव्यसहितानिवायनानिदद्यात् अन्नंसुवर्णपा
त्रस्थंसवस्त्रफलदक्षिणं वायनंगौरिविप्रायददामिप्रीतयेतव सौभा
ग्यारोग्यकामायसर्वसंपत्समृद्धये गौरीगौरीशतुष्ठ्यर्थंवायनंतेददा
म्यहमितिमंत्राभ्यांवायनं० तस्मिन्नहनिकर्तव्यंपूजनंरजनीमुखे
अर्धरात्रेउमाकांतमर्चयेज्जागरंचरेत् ॥

॥ इतिहरितालिकापूजासमाप्ता ॥

॥ श्रीगणेशायनमः ॥ अथ हरितालिका भाषा कथा प्रारभ्यते ॥ भविष्योत्तर पुराणामध्यें कथन केलेला असा जो शिव पार्वतीचा संवाद तो नैमिषारण्याचे ठाईं तो सूत शौनकादि ऋषींला सांगता आहेत प्रथमतः शिव आणि पार्वती या उभयतांला नमस्कार करितात ते कसे आहेत जिणें मंदार पुष्पांची माला केशपाशामध्यें धारण केली आहे दिव्य वस्त्र परिधान केलें आहे

अथकथा ॥ सूतउवाच ॥ मंदारमालाकुलितालकायै कपालमालांकितशेखराय ॥ दिव्यांबरायैचदिगंबरायनमःशिवायैचनमः शिवाय ॥ १ ॥ ॥ कैलासशिखरेरम्येगौरीप्पच्छतिशंकरं ॥ गुह्याद्गुह्यतरंगुह्यंकथयस्वमहेश्वर ॥ २ ॥

अशी जी पार्वती तिला नमस्कार असो रुंड माला जटाजूटा मध्यें धारण करणारा व दिगंबर मूर्ती असा जो शंकर त्याला ही नमस्कार असो ॥ १ ॥ कोणे एके कालीं सुंदर असें जें कैलास पर्वताचें शिखर त्याचे ठाईं पार्वती शंकराला प्रश्न करित्ये कि अत्यंत गुह्य मीं विचारित्यें तें मला सांगावें ॥ २ ॥

हे नाथ जर आपण मजवर प्रसन्न आहां तर संपूर्ण धर्मांचें अल्प आयासानें महत्फल प्राप्त होणारें असें व्रत कोणचें करावें तें मला सत्य सांगावें ॥३॥ आदि मध्यें अंत नाहीं आणि संपूर्ण जगताचा प्रभू असे तुम्ही मला कोणत्या तपें करून अथवा दानें करून किंवा व्रतादिकें करून

सर्वेषांसर्वधर्माणामल्पायासंमहत्फलं ॥ प्रसन्नोसियदानाथत थ्यंब्रूहिममाग्रतः ॥ ३ ॥ केनत्वंहिमयाप्राप्तस्तपोदानव्रता दिना ॥ अनादिमध्यनिधनोभर्तांचैवजगत्प्रभुः ॥ ४ ॥ ईश्वर उवाच ॥ शृणुदेविप्रवक्ष्यामितवाग्रेव्रतमुत्तमम् ॥ यद्गोप्यंमम सर्वस्वंकथयामितवप्रिये ॥ ५ ॥

मर्ता प्राप्त जाहलां हें सांगावें ॥ ४ ॥ शंकर ह्मणतात हे देवी व्रतांमध्यें उत्तम प्रकारचें व्रत तुला सांगतों तें श्रवण कर कारण तूं मला प्रिय आहेस याकरितां माझें सर्वस्व गौप्य तेंही सांगतों ॥ ५ ॥

हें व्रत कसें आहे जसा नक्षत्रामध्यें चंद्र श्रेष्ठ ग्रहामध्यें सूर्य चारवर्णामध्यें ब्राम्हण देवांमध्यें विष्णु श्रेष्ठ ॥ ६ ॥ सर्व तीर्थरूप नद्यांमध्यें जशी गंगा पुराणामध्यें भारत चार वेदांमध्यें सामवेद दशेंद्रियांमध्यें मन श्रेष्ठ असें श्रेष्ठ व्रत सांगतों ॥ ७ ॥ असें उत्तम प्रकारचें व्रत शास्त्रांमध्यें

यथाचोडुगणेचंद्रोग्रहाणांभानुरेवच ॥ वर्णानांचयथाविप्रोदेवा नांविष्णुरेवच ॥ ६ ॥ नदीनांचयथागंगापुराणानांचभारतं ॥ वे दानांचयथासामइंद्रियाणांमनोयथा ॥७॥ पुराणंवेदसर्वस्वमा गमेनयथोदितं ॥ एकाग्रेणशृणुष्वैतद्यथादृष्टंपुरातनं ॥ ८ ॥ येनव्र तप्रभावेनप्राप्तमर्धासनंमम ॥ तत्सर्वंकथयिष्यामित्वंममप्रेयसी यतः ॥ ९ ॥

सांगितलेलें आणि वेदांचें सर्वस्व जें तूं पूर्वी आचरण केलेंस तें आह्मीं पाहिलें तेंच तुला मातां सांगतों तर एकाग्र चित्त करून श्रवण करावेंस ॥ ८ ॥ ज्या व्रताच्या योगेंकरून तुला माझें अर्धासन प्राप्त जाहालें तें संपूर्ण भी तुला कथन करितों कारण मला तूं अत्यंत प्रिय आहेस ॥९॥

भाद्रपद शुक्लपक्षाचेठाईं हस्तनक्षत्रेंकरून युक्त अशी जी तृतीया त्या दिवशीं या व्रताच्या आचरणमात्रेंकरून स्त्रिया सर्व पापापासून मुक्त होतात ॥ १० ॥ हे देवी पूर्वी तूं हिमालयाचेठायीं जें

भाद्रेमासिसितेपक्षेतृतीयाहस्तसंयुता ॥ तदानुष्ठानमात्रेण सर्व पापैः प्रमुच्यते ॥ १० ॥ शृणुदेवित्वयापूर्वंयद्व्रतंचरितंमहत् ॥ तत्सर्वंकथयिष्यामियथावृत्तंहिमालये ॥ ११ ॥ पार्वत्युवाच ॥ कथंकृतंमयानाथव्रतानांव्रतमुत्तमं ॥ तत्सर्वंश्रोतुमिच्छामित्वत्सकाशान्महेश्वर ॥ १२ ॥

महाव्रत आचरण केलेंस तें तुला मीं सर्व सांगतों श्रवण करावेंस ॥ ११ ॥ पार्वती ह्मणते हे नाथ हे शंकरा सर्व व्रतामध्यें श्रेष्ठ असें मीं पूर्वी कसें व्रत आचरण केलें तें आपणापासून श्रवण करण्याची इच्छा करीत आहें ॥ १२ ॥

महादेव म्हणतात हे पार्वती हिमवान्नामक एक उत्तम प्रकारचा पर्वत आहे ज्या पर्वतावर अनेक प्रकारच्या गैरिकादि धातू आहेत आणि नानाप्रकारच्या वृक्षांनीं व्याप्त आहे ॥ १३ ॥ ज्या पर्वतावर अनेक प्रकारचे जे पक्षी तेणेंकरून युक्त नानाप्रकारच्या मृग जातिनी शोभायमान ज्या पर्व

शिवउवाच ॥ अस्तितत्रमान्दिव्योहिमवान्नगउत्तमः ॥ नाना भूमिसमाकीर्णोनानाद्रुमसमाकुलः ॥ १३ ॥ नानापक्षिसमायुक्तोनानामृगविचित्रितः ॥ यत्रदेवाःसगंधर्वाःसिद्धचारणगुह्यकाः ॥१४॥ विचरंतिसदाहृष्टामंधर्वागीततत्पराः॥स्फाटिकैःकांचनैःशृंगैर्मणिवैडूर्यभूषितैः॥१५ ॥

ताचेठाईं देव गंधर्व सिद्ध चारण गुह्यकादि संचार करितात ॥ १४ ॥ ज्या पर्वतावर निरंतर गंधर्व आनंदानें गायन करित होत्साते संचार करितात पर्वताचीं शिखरें कित्येक स्फटिकमय आहेत कित्येक वैडूर्यमण्यांनीं भूषित कांहीं सुवर्णाचीं आहेत ॥ १५ ॥

शिखररूपी जे भुज तींहींकरून आकाशाप्रत भित्र मंदिरासारिखे स्पर्श करीत आहेत कीं काय अ-
सा दिसणारा आणि निरंतर हिमाचे योगानें व्याप्त तसाच गंगेच्या ध्वनीनें शब्दायमान होणारा
॥ १६ ॥ असा जो हिमालय त्याचे ठाईं हे पार्वती तूं बाल्यअवस्थेमध्यें परम श्रेष्ठ तप आचरण

भुजैर्लिखन्निवाकाशंसुहृदोमंदिरंयथा ॥हिमेनपूरितोनित्यंगंगा
ध्वनिनिनादितः ॥१६॥ पार्वतीत्वंयथाबाल्येपरमाचरतीतपः॥
अब्दद्वादशकंदेविधूम्रपानमधोमुखी ॥ १७ ॥ संवत्सरचतुःष
ष्टिपक्वपर्णाशनंकृतं ॥ माघमासेजलेमग्नावैशाखेचाग्निसेवनं ॥
॥ १८ ॥

केलेंस तें असें कीं बारा वर्षेपर्यंत धूम्रपान उलटे पाय व खालीं मुख करून केलेंस ॥ १७ ॥ तसेंच चौसष्ट वर्षेपर्यंत पक्व पर्णांचें भक्षण केलेंस माघमासीं उदकांत बुडून आकंठपर्यंत राहिलीस व वैशाखमासीं पंचाग्नीचें सेवन करून तप केलेंस ॥ १८ ॥

श्रावणमासीं पर्जन्यांत राहून अन्नोदक सोडून तप करणारी अशी तुला पित्यानें पाहून चिंतेच्या योगानें दुःखित होता जाहला ॥ १९ ॥ नंतर विचार करितो कीं अशी तपश्चर्या करणारी कन्या ही मीं कोणाला द्यावी ह्मणून हिमाचल पर्वत चिंतातुर होता जाहला इतक्यांत धर्मवेत्ता ब्रह्मदे

श्रावणेचबहिर्वासअन्नपानविवर्जिता ॥ दृष्ट्वातातेनतत्कष्टंचिंत यादुःखितोऽभवत् ॥ १९ ॥ कस्मैदेयामयाकन्याएवंचिंतातुरो भवत् ॥ तदैवावसरेप्राप्तोब्रह्मपुत्रस्तुधर्मवित् ॥ २० ॥ नारदो मुनिशार्दूलः शैलपुत्रीदिदृक्षया ॥ दत्वार्घ्यंविष्टरंपाद्यंनारदंप्रो क्तवान्गिरिः ॥ २१ ॥

वाचा पुत्र नारदऋषी प्राप्त होता जाहला ॥ २० ॥ ऋषीमध्यें श्रेष्ठ असा नारदमुनी पर्वताची कन्या पाहावी या इच्छेने जो प्राप्त जाहला त्याला आसनपाद्य अर्घ्यादिकानें पुजा करून हिमवानपर्वत नारद ऋषीप्रत भाषण करिता जाहला ॥ २१ ॥

हिमाचल ह्मणतो हे ऋषीश्रेष्ठ नारदा आज आपलें आगमन कोणत्या हेतूनें जाहलें तें सांगावें मला असें वाटतें कीं माझ्या महद्भाग्यें करून आपलें माझें येथें येणें जाहलें ॥२१॥ नारद ह्मणतात हे पर्वत श्रेष्ठा माझें वचन श्रवण कर विष्णूनें मला पाठविलें आहे कशा करितां जर ह्मणशील

हिमगिरिरुवाच ॥ किमर्थमागतोस्वामिन्वदस्वमुनिसत्तम ॥ महाभाग्येनसंप्राप्तंत्वदागमनमुत्तमं ॥ २२ ॥ नारदउवाच ॥ शृणुशैलेंद्रमद्वाक्यंविष्णुमाप्रेषितोस्म्यहं ॥ योग्यंयोग्यायदातव्यंकन्यारत्नमिदंत्वया ॥ २३ ॥ वासुदेवसमोनास्तिब्रह्मादिष्णुशिवादिषु ॥ तस्मैदेयात्वयाकन्याअत्रार्थेसमंतंमम ॥ २४ ॥

तर सांगतों हे तुझें कन्यारत्न योग्य आहे तर हिला योग्यच वर पाहून तूं द्यावें ॥ २३ ॥ या विषयीं माझें मत सांगतों ब्रह्म विष्णू शिवादि संपूर्ण देवतामध्यें वासुदेवा सारिखा दुसरा कोणी नाहीं या करितां ही कन्या तूं वासुदेवाला द्यावी ॥ २४ ॥

असें नारदाचें भाषण ऐकून हिमवान् ह्मणतो जर स्वतः वासुदेव माझे कन्येला मागतो आणि या कार्याकारितां माझ्या घरीं आपण आलां तर ही कन्या वासुदेवालाच अवश्य देईन ॥ २५ ॥ असें हिमाचल पर्वताचें भाषण ऐकून नारदमुनी आकाशामध्यें अंतर्धान पावता जाहला नंतर

हिमगिरिरुवाच वासुदेवः स्वयंदेवःकन्यांप्रार्थयतेयदि ॥ तदाम यामप्रदातव्यात्वदागमनगौरवात् ॥ २५ ॥ इत्येवंगादितंश्रुत्वानभ स्यंतर्दधेमुनिः॥ ययौपीतांबरधरंशंखचक्रगदाधरं॥ कृतांजलिपु टोभूत्वामुनींद्रस्तमभाषत ॥ २६ ॥ नारदउवाच ॥ शृणुदेवभ वत्कार्यंविवाहोनिश्चितस्तव ॥ हिमवांस्तुतदागौरीमुवाचवच नंमुदा ॥ २७ ॥

शंख चक्र गदा धारण करणारा पीतांबर परिधान केलेला असा जो भगवान् विष्णू त्याचे समीप जाऊन हात जोडून नारदऋषी त्याप्रतभाषण करिता जाहला ॥ २६ ॥ नारद ह्मणतोहे देवा

आपलें विवाहरूप कार्याचा निश्चय करून आलों तें ऐका हिमाचल पर्वताचे कन्येशीं तुमचे विवाहाचा निश्चय करून आलों आहें नंतर हिकडे आनंदानें हिमवान् पर्वत आपली कन्या जी गौरी तिजप्रत भाषण करिता जाहला ॥ २७ ॥ हे कन्ये तुला मीं गरुडध्वज भगवान् जो विष्णु

दत्तासित्वंमयापुत्रिदेवायगरुडध्वजे॥श्रुत्वावाक्यंपितुर्देवीगता सासखिमंदिरं॥२८॥ भूमौपतित्वासादेवीविललापातिदुःखिता विलपंतींतदादृष्ट्वासखीवचनमब्रवीत्॥ २९॥ किमर्थंदुःखितादेविकथयस्वममाग्रतः॥यद्भवत्याभिलषितंकरिष्येहंनसंशयः३०॥

त्याला देण्याचा निश्चय केला आहे असें पित्याचें वचन श्रवण करून पार्वती आपल्या सखीच्या मंदिराप्रत जाती जाहली ॥ २८ ॥ नंतर तेथें भूमीवर पडून अत्यंत दुःखित होत्साती विलाप करिती जाहली त्याकालीं सखी पार्वती विलाप करित्ये असें पाहून तिजप्रत भाषण करिती जाहली ॥ २९ ॥ हे देवी तूं कोणत्या कारणानें दुःखित जाहली आहेस तें मला कथन करावेंस जें तुझ्या मनांत असेल तें मीं निःसंशय करीन ॥ ३० ॥

पार्वती म्हणत्ये हे सखी मला प्रीतीनें जी मनाची इच्छा आहे ती तुला सांगत्यें तूं श्रवण कर महादेवाला भर्ता करावा अशी माझी इच्छा आहे यांत संशय नाहीं ॥ ३१ ॥ हें माझें मनांतून चिंतित कार्य असून पित्यानें अन्यथा केलें आहे याकरितां हे प्रियसखी मीं देहाचा परित्याग

पार्वत्युवाच ॥ शृणुसखिममप्रीत्यामनोभिलषितंयथा ॥ महादे
वंचभर्तारंकरिष्येहंनसंशयः ॥ ३१ ॥ एतन्मेचिंतितंकार्यंताते
नकृतमन्यथा ॥ तस्माद्देहपरित्यागंकरिष्येऽहंसखिप्रिये॥३२॥
पार्वत्यावचनंश्रुत्वासखीवचनमब्रवीत् ॥ सख्युवाच ॥ पिताय
त्रनजानाति गमिष्यावोहितद्वनं ॥ ३३ ॥

करीन ॥ ३२ ॥ असें पार्वतीचें भाषण ऐकून सखी बोलती जाहली सखी ह्मणत्ये हे देवी तुझ्या पित्याला माहीत पडणार नाहीं अशा वनामध्यें गमन करूं चला ॥ ३३ ॥

असा सखीनें विचार करून तुला मोठ्या गहन वनामध्यें नेली मंतर तुझा पिता हिकडे घरोघर शोध करिता जाहला ॥ ३४ ॥ शोध लागेना तेव्हां पर्वत म्हणतो कीं माझी कन्या देवानीं नेली किंवा दानवानीं अथवा गंधर्वानीं हें समजत नाहीं नारदाच्या पुढें मी सत्य केलें आहे तर

इत्येवंसंमतंकृत्वानीतासित्वंमहद्वनं ॥ पितानिरीक्षयामासहि मवांस्तुगृहेगृहे ॥ ३४ ॥ केननीतासिमेपुत्रिदेवदानवकिन्नरैः। नारदाग्रेकृतंसत्यंकिंदास्येगरुडध्वजे ॥ ३५ ॥ इत्येवंचिंतया विष्टोमूर्च्छितोनिपपातह ॥ हाहाकृत्वाप्रधावंतिलोकास्तंगिरि पुंगवं ॥ ३६ ॥

आतां गरुडध्वज जो भगवान् त्याला काय द्यावें ॥ ३५ ॥ या प्रकारेंकरून चिंतातुर होत्साता मूर्च्छा येवून पतन पावता जाहला तेव्हां पर्वतावर राहणारे लोक हाहाकार करून त्या हिमाचलाप्रत धांवून प्राप्त जाहले ॥ ३६ ॥

आणि म्हणतात कीं हे पर्वतराजा तुला असें दुःख होण्याचें कारण काय तें सांगावें तेव्हां हिमाचल ह्मणतो दुःखाचें कारण सांगतों तें श्रवण करा माझें कन्यारत्न कोणीं हरण केलें अथवा कालसर्पानें दंश केला किंवा सिंह व्याघ्रानीं मारिली ॥ ३७ ॥ किंवा कन्या कोठें गेली अथवा कोणी दुष्टानें हरण करून नेली हें समजत नाहीं असें बोलून वायूच्या योगानें महान् वृक्ष जसा

ऊचुर्गिरिवरंसर्वेमूर्च्छाहेतुंगिरेवद ॥ गिरिरुवाच ॥ दुःखस्यहेतुं श्रुणुतकन्यारत्नंहृतंमम ॥ दष्टावाकालसर्पेणसिंहव्याघ्रेणवा हता ॥ ३७ ॥ नजानेक्वगतापुत्रीकेनदुष्टेनवाहृता ॥ चकंपेशोक संतप्तोवातेनेवमहातरुः ॥ ३८ ॥ गिरिवनाद्वनंयातस्त्वदालो कनकारणात् ॥ सिंहव्याघ्रैश्चभल्लैश्चरोहिभिश्चमहाघनं ॥३९॥

कंपित होतो तसा तो पर्वत कंपित होता जाहला ॥ ३८ ॥ नंतर तुला पाहण्याकरितां सिंह व्याघ्र भल्ल रोहे इत्यादि भयंकर जीं श्वापदें तेणेंकरून युक्त असें जें वन त्यामध्यें या वनांतून त्या वनांत तो पर्वत भ्रमण करिता जाहला ॥ ३९ ॥

तूंहि घोर आरण्यामध्यें सखी सहवर्तमान फिरत होत्साती त्या वनांत सुंदर एक नदी अवलोकन केलीस व त्यानदीतीरीं एक महान गुहा पाहिलीस ॥ ४० ॥ नंतर त्या गुहेमध्यें सखी सहवर्तमान प्रवेश करून अन्नभोग विवार्जित होत्साती वालुकेचें लिंग पार्वती सहवर्तमान माझें स्थापन

त्वंचापिविपिनेघोरेव्रजंतीसखिभिःसह ॥ तत्रद्दष्ट्वानदींरम्यांत
त्तीरेचमहागुहां ॥४०॥ तांप्रविश्यसखीसार्धंअन्नभोगविवर्जिता
संस्थाप्यवालुकालिंगंपार्वत्यासहितंमम ॥ ४१॥ भाद्रशुक्लतृती
यायामर्चयंतीतुहस्तभे॥ तत्रवाद्येनगीतनरात्रौजागरणंकृतं ॥४२॥

करिती जाहलीस ॥ ४१ ॥ भाद्रपद शुद्ध तृतीयेचे दिवशीं हस्त नक्षत्र युक्त असतां वालुका लिंगाचें पूजन करून त्या दिवशीं रात्री गीत वाद्यादिकें करून जागरण करिती जाहालीस ॥ ४२ ॥

त्या व्रता राजाच्या सामर्थ्यें करून माझें आसन चलित होतें जाहलें तेव्हां सखीसहवर्तमान ज्या ठिकाणीं तूं होतीस त्या ठिकाणीं मीं प्राप्त जाहालों ॥ ४३ ॥ आणि मीं तुला सांगितलें कीं हें वरानने प्रसन्न जाहलों आहें जी इच्छा असेल तो वर मागावास ॥ ४४ ॥ असें माझें

व्रतराजप्रभावेनआसनंचलितंमम ॥ संप्राप्तोहंतदातत्रयत्रत्वं सखिभिःसह ॥४३॥ प्रसन्नोस्मिमयाप्रोक्तंवरंब्रुहिवरानने॥४४॥ पार्वत्युवाच यदिदेवप्रसन्नोसिभर्ताभवमहेश्वर॥ तथेत्युक्त्वातु संप्राप्तःकैलासंपुनरेवच ॥ ४५ ॥ ततःप्रभातेसंप्राप्तेनद्यांकृत्वा विसर्जनं ॥ पारणंतुकृतंतत्रसख्यासार्धंत्वयाशुभे ॥ ४६ ॥

भाषण ऐकतांच पार्वती तूं ह्मणालीस कीं हे देव जर मला प्रसन्न आहेस तर माझा भर्ता हो असें तुझें वचन ऐकून तथास्तु असें मीं बोलिलों नंतर पुनः कैलासाप्रत गेलाजाहलों॥ ४५॥ नंतर तूं प्रातःकालीं नदीमध्यें लिंगाचें विसर्जन करून सखीसहवर्तमान तूं पारणा करिली आहालीस॥४६॥

क० ॥१२॥

इतक्या मध्यें हिमवान् पर्वत चारी दिशा पाहात पाहात व्याकूळ होवून भूमीवर पतन पावत होत्साता त्या गहन वनाप्रत प्राप्त होता जाहाला ॥४७॥ नंतर त्याणें नदीतीराचे ठाईं दोन कन्या निजलेल्या आहेत असें पाहून उठवून आपल्या मांडीवर घेवून पर्वत रोदन करिता जाहला॥४८॥

हिमवानपितंदेशमाजगामघनंवनं।चतुराशानिरीक्षंस्तुविव्हलः
पतितोभुवि ॥४७॥ दृष्ट्वातावन्नदीतीरेप्रसुप्तंकन्यकाद्वयं॥उत्था
प्योत्संगमारोप्यरोदनंकृतवान्गिरिः॥४८॥ सिंहव्याघ्रादिभल्लू
कैर्वनेदुष्टेकुतःस्थिता ॥४९ ॥ पार्वत्युवाच ॥ शृणुतातमयाज्ञातं
त्वंदास्यसीश्वरायमां ॥तदन्यथाकृतंतातातेनाहंवनमागता॥५०॥

आणि पार्वतिला म्हणतो कीं हे कन्ये सिंह व्याघ्र आस्वल अशा दुष्ट श्वापदानीं युक्त जें अरण्य यामध्यें कशाकरितां प्राप्त जाहलीस ॥ ४९ ॥ असें पित्याचे भाषण ऐकून पार्वती म्हणत्ये हे तात मीं सांगत्यें ऐक तूं मला माहादेवाला देशील असें वाटत होतें परंतु तें तूं अन्यथा केलेंस याकरितां मीं वनांत निघून आल्यें ॥ ५० ॥

आतां जर मला महेश्वराला तूं देशील तर मीं गृहाप्रत येईन नाहींतर येथेंच निश्चयें करून राहीन ॥५१॥ असा तुझा निश्चय पाहून हिमाचलानें फार चांगलें आहे महादेवास देईन असें तुला सांगून महादेव म्हणतात हे पार्वती तुला घरीं आणून यथाशास्त्र विवाह करून आम्हांस

ददासितातयदिमामीश्वरायतदागृहं ॥ आगमिष्यामिनैवंचेदि हस्थास्यामिनिश्चितं ॥५१॥ तथेत्युक्त्वाहिमवतानीतासित्वं गृहंप्राति ॥ पश्चाद्दत्तात्वमस्माकंकृत्वावैवाहिकींक्रियां ॥ ५२ ॥ तेनव्रतप्रभावेनसौभाग्यंसाधितंत्वया ॥ अद्यापिव्रतराजस्तुन कस्यापिनिवेदितः ॥ ५३ ॥ नामास्यव्रतराजस्यशृणुदेवियथा ऽभवत् ॥ आलिभिर्हरितायस्मात्तस्मात्साहरितालिका ॥ ५४॥

दिली ॥५२॥ तर तूं त्या व्रताच्या प्रभावेंकरून हें सौभाग्य साधन केलेंस या प्रकारचा व्रतराज अद्यापपर्यंत कोणाला मीं सांगितला नाहीं ॥ ५३ ॥ हे देवी या व्रतराजाचें नाम कसें जाहलें तें तुला सागतों श्रवण कर आली ह्मणजे सखी तिणें तुला हरण करून आणलें ह्मणून या व्रताला हरितालिका असें म्हणतात ॥ ५४ ॥

पार्वती म्हणत्ये हे देव व्रताचें नाम आपण सांगितलें परंतु हे प्रभो या व्रताचा विधी कसा आहे तो मला सांगा आणि यापासून काय पुण्य काय फल प्राप्त होतें व हें व्रत कोणी करावें तेंही कथन करावें ॥५५॥ शिव म्हणतात हे देवी हें व्रत स्त्रियांला सौभाग्य हेतुक आहे जर सौभाग्य

देव्युवाच ॥ नामेदंकथितंदेवविधिंवदममप्रभो ॥ किंपुण्यंकिंफलंचास्यकेनचाक्रियतेव्रतं ॥ ५५ ॥ ईश्वरउवाच ॥ शृणुदेविविधिंवक्ष्येनारीसौभाग्यहेतुकं ॥ करिष्यतिप्रयत्नेनयदिसौभाग्यमिच्छति ॥ ५६ ॥ तोरणादिप्रकर्त्तव्यंकर्दलीस्तंभमंडितं ॥ आच्छाद्यपट्टवस्त्रैस्तुनानावर्णविचित्रितैः ॥ ५७ ॥

वृद्धीची इच्छा असेल तर हें व्रत प्रयत्नेंकरून अवश्य स्त्रियांनीं करावें ॥ ५६॥ आतां व्रत करण्याचा प्रकार मीं तुला सांगतों कर्दली स्तंभानीं शोभायमान असें तोरण बांधावें आणि तें तोरण रंगित उत्तम प्रकारचें वस्त्रांनीं अच्छादित करावें शुभ्र वस्त्राचें छत बांधावें ॥ ५७ ॥

50490

सुगंधिक चंदनें करून ग्रहमंडप लेपन करवा शंख भेरी मृदंगादिक नाना प्रकारचीं वाद्यें वाजवावीं ॥ ५८ ॥ नानाप्रकारचीं मंगल गीतें माझ्या मंदिरांत गायन करावीं पार्वतीसहवर्तमान माझें वालुकेचें लिंग स्थापन करावें ॥ ५९ ॥ नंतर अनेक प्रकारच्या पुष्पेंकरून पूजन करावें गंध धूप

चंदनेनसुगंधेनलेपयेद्गृहमंडपं॥ शंखभेरीमृदंगैस्तुकारयेद्बहुनिःस्वनं ॥ ५८ ॥ नानामंगलगीतंचकर्तव्यंममसद्मनि ॥ स्थापयेद्बालुकालिंगंपार्वत्यासहितंमम ॥ ५९ ॥ पुजयेद्बहुपुष्पैश्चगंधधूपादिभिर्नवैः ॥ नानाप्रकारैर्नैवेद्यैःपुजयेज्जागरंचरेत् ॥ ६० ॥ नारीकेरैःपूगफलैर्जंबीरैर्बहुभिस्तथा ॥ बीजपूरैःसनारिंगैःफलैश्चान्यैश्चभूरिशः ॥ ६१ ॥

दिप नानाप्रकारचे नैवेद्य समर्पण करून रात्री जाग्रण करावें ॥ ६० ॥ नारीकेळ आणि पूगफलें व जांभळें माहुळंग नारिंगे इत्यादिक अनेक प्रकारचीं फलें मला अर्पण करावीं ॥ ६१ ॥

आणि त्या ऋतूमध्यें अनेक प्रकारचीं कंद मूल फलें जीं उत्पन्न जाहालेलीं असतील तीं अपर्ण मला करून गंध, पूष्प, धूप दिपादिकें करून या मंत्रानीं पूजन करावें ॥ ६२ ॥ तो मंत्र कोणता नमःशिवायशांताय आणि शिवाय हरकांतायै असे दोन मंत्र म्हणोन षोडशोपचारें करून पूजन

ऋतुकालोद्भवैर्भूरिप्रकारैःकंदमूलकैः ॥ गंधपुष्पैर्धूपदीपैर्मंत्रेणानेनपूजयेत् ॥ ६२ ॥ नमःशिवायशांतायपंचवक्त्रायशूलिने ॥ नंदिभृंगिमहाकालगणयुक्तायशांभवे ॥ ६३ ॥ शिवायैहरकांतायैप्रकृत्यैसृष्टिहेतवे ॥ शर्वाण्यैसर्वमांगल्येशिवरूपेजगन्मये ॥ ॥ ६४ ॥ शिवेकल्याणदेनित्यंशिवरूपेनमोस्तुते ॥ शिवरूपेनमस्तुभ्यंशिवायैसततंनमः॥ ६५ ॥

करावें ॥ ६३ ॥ नंतर नमस्कार करून प्रार्थना करावी ती कशी हे शिवे कल्याणकारके शिव रूपी तूं आहेस तुला निरंतर माझा नमस्कार असो ॥ ६४ ॥ आणि तूंकशी आहेस ब्रह्मचा[redacted] जगताची धात्री या तुला नमस्कार असो हे सिंहवाहिनी संसारभय संतापापासून मला रक्षण कर॥६५॥

ज्या कामनेंकरून तुझे मीं पूजन केलें त्या कामना माझ्या सर्व पूर्ण कराव्या त्या कोणत्या राज्य सौभाग्य संपत्ती हीं मला द्यावींस अशी प्रार्थना करावी ॥ ६६ ॥ महादेव म्हणतात हे देवी या मंत्रें करून मजसहवर्तमान तुझें पूजन करावें आणि विधियुक्त कथा श्रवण करून बहुत ब्राम्ह

नमस्तेब्रह्मचारिण्यैजगद्धात्र्यैनमोनमः ॥ संसारभयसंतापात्पा हिमांसिंहवाहिनि ॥६६॥ येनकामेनदेवित्वंपूजितासिमहेश्वरि॥ राज्यंसौभाग्यसंपत्तिंदेहिमामंबपार्वति ॥ ६७ ॥ मंत्रेणानेनदे वित्वांपूजयित्वामयासह ॥ कथांश्रुत्वाविधानेनदद्यादन्नंचभू रिशः ॥ ६८ ॥

णाला अन्न द्यावें ॥ ६७ ॥ आणि यथाशक्ती ब्राम्हणाला वस्त्र हिरण्य गाई द्यावी भूयसी दक्षणा देऊन सुवासिनी स्त्रियांस सौभाग्यादि अलंकार द्यावे ॥ ६८ ॥

आणि भक्तियुक्त अंतःकरणानें पतीसहवर्तमान कथा श्रवण करावी असें श्रेष्ठ व्रत हें आचरण केलें असतां स्त्रिया सर्व पापापासून मुक्त होतात ॥ ६९ ॥ आणि या व्रताच्या योगेंकरून सप्त जन्मामध्यें राज्य प्राप्त होतें व सौभाग्याची वृद्धी होत्ये जी स्त्री भाद्रपद शुद्ध तृतीयेचे दिवशीं

ब्राह्मणेभ्योयथाशक्त्यादेयावस्त्रहिरण्यगाः ॥ अन्येषांभूयसीदे यास्त्रीणांवैभूषणादिकं ॥ ६९ ॥ भर्तासहकथांश्रुत्वाभक्तियुक्ते नचेतसा ॥ कृत्वाव्रतेश्वरंदेविसर्वपापैःप्रमुच्यते ॥ ७० ॥ सप्तजन्मभवेद्राज्यंसौभाग्यंचैववर्धते॥ तृतीयायांतुयानारीआ हारंकुरुतेयदि ॥ ७१ ॥

अन्न भक्षण करित्ये तिला दुःख प्राप्त होतें ॥ ७० ॥ तें कोणचें सात जन्मपर्यंत वंध्या आणि जन्म जन्माचे ठाईं वैधव्य पुत्रशोक दारिद्र्य कर्कशा अशीं अनेक प्रकारचीं दुःख भोगणारी होत्ये ॥ ७१ ॥

जी स्त्री त्या दिवशीं उपोषण करीत नाहीं ती घोर नरकामध्यें पतन पावत्ये याकरितां त्या दिवशीं व्रत करून ब्राम्हणाला वायन द्यावें तें कसें रौप्यमय किंवा सुवर्णाचें अथवा तांब्याचें किंवा वेणुमय ॥७२॥ पात्रामध्यें अन्नें वस्त्र फल दाक्षिणा ठेवून ब्राम्हणाला दान द्यावें नंतर पारणा

सप्तजन्मभवेद्वंध्यावैधव्यंसप्तजन्मनि ॥ दारिद्र्यंपुत्रशोकंचक
र्कशादुःखभागिनी ॥७२॥ पच्यतेनरकेघोरेनोपवासंकरोतिया॥
राजतेकांचनेताम्रेवैणवेचाथमृन्मये ॥॥ ७३ ॥ भाजनेविन्यसे
दन्नंसवस्त्रफलदक्षिणं ॥ दानंचद्विजवर्यायदद्यादंतेचपारणं॥७४

करावी ॥ ७३ ॥ असें हें हरितालिकेचें व्रत जी स्त्री विधी करून करित्ये ती स्त्री तुझ्यासारखी पतीसहवर्तमान रममाण होत्ये आणि पृथ्वीवर अनेक प्रकारचें सुख भोगून शेवटीं शिवस्वरूपीं सायुज्यमुक्ती पावत्ये ॥ ७४ ॥

आणि या कथेच्या श्रवणमात्रेंकरून अश्वमेध यज्ञ व वाजपेय यज्ञाचें फल प्राप्त होतें ॥ ७५ ॥
महादेव म्हणतात हे देवी असें उत्तम प्रकारचें व्रत हें मीं तुला कथन केलें या व्रताच्या

एवंविधियाकुरुतेचनारीत्वयासमानारमतेचभर्त्रा ॥ भोगानने
कानुभुविभुज्यमानासायुज्यमंतेलभतेहरेण ॥ ७५ ॥ अश्वमेध
सहस्राणिवाजपेयशतानिच ॥ कथाश्रवणमात्रेणतत्फलंप्राप्य
तेनरैः ॥ ७६ ॥ एतत्तेकथितंदेवीतवाग्रेव्रतमुत्तमं ॥ कोटियज्ञ
कृतंपुण्यमस्यानुष्ठानमात्रतः ॥ ७७ ॥ इतिश्रीभविष्योत्तरपुरा
णेशिवगौरीसंवादेहरितालिकाकथासमाप्तः ॥

आचरणमात्रें करून कोटि यज्ञाचें फल प्राप्त होतें ॥ ७६ ॥ इति हरितालिका कथा व्याख्या
समाप्तः श्री सांब सदाशिवार्पणमस्तु ॥

आरती सांबाची.

लवथवतीविक्राळाब्रह्मांडेंमाळा ॥ विषेंकंठकाळात्रिनेत्रींज्वाळा ॥ लावण्यसुंदरमस्तकींबाळा ॥ तेथुनियांजळनिर्मळवाहेझुळझूळां ॥ जयदेवजयदेवजयश्रीशंकरा ॥ आरतीओंवाळूंतुजकर्पूरगौरा ॥ ॥ धृ० ॥ १ ॥ कर्पूरगौरभोळानयनींविशाळा ॥ अर्धांगींपार्वतीसुमनाच्यामाळा ॥ विभुतीचेंउधळण शितिकंठनीळा ॥ ऐसाशंकरशोभेउमावेल्हाळा ॥ २ ॥ देवींदैत्यींसागरमंथनपैंकेलें ॥ त्यामाजीअव चीतहळाहळसांपडलें ॥ तेंत्वांअसुरपणेंप्राशनकेलें ॥ नीलकंठनामप्रसिद्धझालें ॥ ३ ॥ व्याघ्रांबरफ णिवरधरसुंदरमदनारी ॥ पंचाननमनमोहनमुनिजनसुखकारी ॥ शतकोटीचेंबीजवाचेउच्चारी ॥ रघु कुळतिलकरामदासाअंतरीं ॥ ४ ॥

हें पुस्तक

पुरंदरे आणि कंपनी

मुंबईमध्यें " श्रीकल्पतरु " छापखान्यांत छापीलें.

शके १८१७, सन १८९५

(सर्व हक्क प्रसिद्ध कर्त्यानें ठेविले आहेत).

इति हरतालिकापूजाकथा समाप्तः

VSa 294.5
Har
R 50490

AUTHOR Hayithanika puja

TITLE Kathas.

Date Due

VSa 294.5
Har
50490